दिनांक ०५.१२.२०२३

# पदभरती बाबत आदेश

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई व राष्ट्रीय आयुष अभियान, मुंबई अंतर्गत सेवा समाप्त केलेल्या उमेदवारांना विविध कंत्राटी पदांसाठी अपात्र घोषीत करणे.

दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई व राष्ट्रीय आयुष अभियान, मुंबई अंतर्गत कंत्राटी पदांकरिता ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त अर्ज व कागदपत्रांच्या छाननी अंती व जाहिराती मधील शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या निकषानुसार खालील पदनिहाय नमुद उमेदवारांची पात्र व अपात्र यादी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी ११.५९ वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेपानुसार उमेदवाराने अर्ज सादर करते वेळी पोर्टलवर अपलोड केलेल्या मुळ कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे पुनश्च: छाननी करुन अंतिम पात्र/अपात्र यादी दि. ०१.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि, या कार्यालयाच्या दिनांक २४.०६.२०२२ च्या परिपत्रकान्वये खालील उमेदवारांच्या सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानातुन यापुर्वीच समाप्त करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर उमेदवारांना या पदभरतीमध्ये अपात्र घोषीत करण्यात येत आहे. परीपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

१. डॉ. पवन देविदास धाकडे
२. डॉ. प्रशांत रत्नाकर भोईर
३. डॉ. कैलाश वाल्मिक नगराळे

(सुभाष शां. बोरकर)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

Scanned with OKEN Scanner

**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१

परिपत्रक

जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/कार्यमुक्त कर्मचारी/१००२३-२५०/२०२२
दिनांक- २४/०६/२०२२

**विषय** -राष्ट्रीय आरोग्य अभियानातून सेवा समाप्त केलेल्या कर्मचा-यांबावत.

**संदर्भ** - १) जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद, सातारा यांचे दि.२२.०३.२०२२ रोजीचे पत्र क्र.Outward No: NHM/भरती प्रक्रिया मार्गदर्शन / १०६९/२०२२

२) मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांची दि.१५.०५.२०२२ रोजीची ई-नस्ती क्र.१६/११/२०२२-HR वरील मान्य टिपणी.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या कार्यालयास प्राप्त पत्रानुसार,राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हास्तरावर विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविणेत येत असून यामध्ये शासकीय/निमशासकीय/एनएचएम कार्यालयामध्ये पुर्वी कार्यरत असलेल्या कर्मचारी- ज्यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे, सेवेत अनियमितता असल्यामुळे व विविध तक्रारींमुळे संबंधित आस्थापनाने त्यांना सेवेतुन कार्यमुक्त केलेले आहे अशा कर्मचा-यांचे दुस-या भरती प्रक्रियेसाठी जिल्हास्तरावर अर्ज प्राप्त झाल्यास सदर उमेदवारांची निवड होण्याची शक्यता असल्यास अशा कर्मचा-यांची पुन्हा निवड करून त्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत अगर कसे याबावत मार्गदर्शन मागितले होते.

या अनुषंगाने,संदर्भ क्र.२ अन्वये मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे मंजुर टिपणी नुसार आपणास कळविण्यात येते कि, राष्ट्रीय आरोग्य अभियान मधून कोणत्याही संस्थास्तरावरून (राज्यस्तर,विभागीयस्तर,जिल्हास्तर,महानगरपालिकास्तर,प्रशिक्षण संस्थास्तर इत्यादी) एखाद्या कर्मचा-याच्या अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आल्या असतील तर त्या कर्मचा-याचा यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कोणत्याही पदाकरीता विचार केला जाणार नाही व सदर कर्मचा-यास यापुढे राष्ट्रीय आ. अभियानात पुन्हा काम करण्याची संधी देण्यात येवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

याकरिता संबंधित संस्थास्तरावर भरती प्रक्रिया राबवीत असताना राष्ट्रीय आरोग्य अभियानातून सेवा समाप्त केलेल्या आहेत, अशा कर्मचा-यांची यादी अद्यावत ठेवण्यात यावी तसेच नव्याने निवड करण्यात येणा-या उमेदवाराने जर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर केले असेल तर त्या प्रमाणपत्रावरून संबंधित आरोग्यसंस्थेकडून (राज्यस्तर /विभागीयस्तर/महानगरपालिकास्तर/ जिल्हास्तर/प्रशिक्षण संस्थास्तर व संबंधित इतर संस्था) सदर उमेदवाराच्या सेवा वरील कारणास्तव समाप्त केल्या नसल्याबाबत आपल्या स्तरावरून शहानिशा करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

२५/६/२२
(संजय सरवदे)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रति,

- संचालक राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर
- उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ,(सर्व)

(कृ.मा.प)...



Scanned with OKEN Scanner

- जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा सामान्य रुग्णालय. (सर्व)
- जिल्हा आरोग्य अधिकारी. जिल्हा परिषद. (सर्व)
- प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, (सर्व)
- वैद्यकीय आरोग्य अधिकारी,महानगरपालिका (संबंधित सर्व)
- मुख्याधिकारी,नगरपालिका/नगरपरिषद,(संबंधित सर्व)
- मुख्याधिकारी, कटकमंडळे (संबंधित सर्व)

**प्रत माहितीस्तव सादर,**

- मा.अप्पर मुख्य सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई
- मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक ,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई
- मा.आयुक्त (महानगरपालिका सर्व)
- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
- मा.संचालक आरोग्य सेवा मुंबई/पुणे
- मा.कार्यक्रम प्रमुख मुंबई/पुणे (संबंधित सर्व)



Scanned with OKEN Scanner